# महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे "आयडॉल्स"

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ "शेतकरी आयडॉल"

### श्री. भाऊसो श्रीरंग जाधव
### सौ. पल्लवी भाऊसो जाधव

मु.पो. तासगांव, ता. जि. सातारा



संपर्क क्र.: ७५८८०६१४८५

**जमीनधारणा क्षेत्र :** १५ एकर
**प्रमुख पिके :** आले, उस, टोमॅटो, संकरीत नेपिअर, मका
**शिक्षण :** बी.एस्सी. (कृषि)

**शेतीमधील उल्लेखनीय संशोधन कार्य**

- टिशु कल्चर केळी लागवड
- ग्रीन हाऊसमध्ये जरबेरा, ग्लॅडीओलस, निशिगंध यांची फुलशेती
- व्हर्टीकल पध्दतीने खरबुजाची लागवड, ३ महिन्यामध्ये ८ टन उत्पादन
- आधुनिक तंत्रज्ञान वापरुन आले व उस लागवड, उत्कृष्ट बेणे उत्पादन
- पाण्याची बचत व खतांच्या कार्यक्षम वापरासाठी फर्टीगेशन तंत्राव्दारे खत व पाणी व्यवस्थापन
- पशुधनासाठी उच्च वंशावळीच्या व अधिक उत्पादनक्षम जनावरांची निवड
- योग्य आहार व व्यवस्थापनाव्दारे एका जनावरापासुन प्रतिदिन ४० लिटरपर्यंत दुध उत्पादन
- मुक्त संचार गोठा पध्दतीचा अवलंब करुन रोगराई कमी करण्यात यश. त्यामुळे स्वच्छ व आरोग्यदायी दुध उत्पादन
- जिवाणुंच्या (ई.एम. सोलुशन) वापरामुळे जनावरांचे उत्तम आरोग्य, शेणाला वास नाही, कुजण्यास मदत, जिवाणुयुक्त चांगल्या प्रतीचे खत
- उत्तम गुणवत्तेच्या कालवडी मिळविण्यासाठी सेक्ससॉर्टेड सिमेन (लिंग निर्धारीत वीर्यमात्रा) तंत्रज्ञानाचा वापर
- अधिक उत्पादनक्षम व पौष्टिक गुणधर्म असणाऱ्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाने शिफारस केलेल्या चारापिकांची लागवड

**शेतीनिगडीत व्यवसाय :** दुग्धव्यवसाय, ग्रीन हाऊसमधील फुलशेती, शेतबांधावर विविध फळझाडांची लागवड

**तंत्रज्ञानाचा प्रसार**

- दुरदर्शन केंद्रामार्फत शेती व पशुधन व्यवस्थापनाबद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन
- आकाशवाणी, सातारा यांच्यामार्फत आधुनिक पशुपालन या विषयाचे मार्गदर्शन

**सामाजिक क्षेत्रातील योगदान**

- नविन पशुधन उद्योजकांना जनावरांचे आहार व्यवस्थापन, खनिजद्रव्यांचा वापर, चारापिकांची लागवड व जनावरांची निवड याबद्दल मार्गदर्शन
- फुलशेतीमध्ये पिकांची व वाणांची निवड करण्यामध्ये, रोपे उपलब्धता व विक्री व्यवस्थेसाठी इतर शेतकऱ्यांना सहकार्य
- गांवामध्ये दुध संकलन केंद्राची स्थापना व दुधाला योग्य दर मिळवुन देण्यासाठी सहकार्य

**पुरस्कार**

- कृषि विभाग व आत्मा, सातारा यांचेकडून उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार - २०१९
- महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या विस्तार शिक्षण परिषदेचे सदस्य

**वार्षिक उत्पन्न**

- वार्षिक उत्पन्न : रु. १६ लाख






## महात्मा फुले कृषि विद्यापीठ "कृषि पदवीधर आयडॉल"

### श्री. प्रदीप शरद गोडसे

कृषि उद्योजक, कृषि महाविद्यालय, कराड (बी. एस्सी. कृषि) (२०१९)
मु. येवती, ता. मोहोळ, जि. सोलापूर



संपर्क क्रं. : ७३८७३७३०२९

**उद्योगाचे नांव व माहिती**

- गोडसे बेदाणे निर्मिती केंद्र - २०१५
- गोडसे नर्सरी - २०१९
- बाळराजे पाटील दुध संकलन केंद्र - २०२३

**शिक्षण**

- बी.एस्सी. (कृषि)

**उद्योगामधील नाविण्यपूर्ण तंत्रज्ञान**

- द्राक्ष सुकविण्यासाठी भट्टीचा वापर, गंधकाच्या धुरीचा वापर केल्याने चांगल्या प्रतीच्या मणुक्यांची निर्मिती
- नर्सरीमध्ये रोपांसाठी अद्ययावत पॉलीहाऊस व शेडनेट उभारणी
- फळपिकांच्या लिंबू (साई सरबती), डाळिंब (भगवा), सिताफळ (बाळानगर) अशा विविध जातींची रोपे उपलब्ध तसेच संपूर्ण महाराष्ट्रासह कर्नाटकमध्ये रोपे, कलमे विक्री
- ठिबक सिंचन, तुषार सिंचन इ. सुधारीत तंत्रज्ञानाचा वापर
- योग्य व्यवस्थापन करुन ९ एकर क्षेत्रावर पेरुची लागवड केल्यामुळे विक्रमी उत्पन्न
- दुधाची प्रत पाहण्यासाठी तसेच मिल्किंगसाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर, ११०० लि. दररोजचे दुध संकलन
- दुधाची प्रत व दर या विषयी ग्राहकांना दररोज संदेश देण्याची सुविधा

**वार्षिक उलाढाल :** रु. ४० ते ५० लाख

**व्यावसायिक / सामाजिक क्षेत्रातील योगदान**

- मणुके तयार करणेबाबत द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांना सल्ला व मार्गदर्शन
- फळबाग निर्मितीसाठी गरीब शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन व कमी दरामध्ये रोपांची विक्री
- अत्यंत गरीब शेतकऱ्यांना रोपांचे मोफत वाटप
- स्वतःच्या वाढदिवसाच्या दिवशी तसेच स्वातंत्र्यदिनी गावामध्ये रोपांचे मोफत वाटप करुन वृक्षारोपन कार्यक्रमाचे आयोजन

**रोजगार निर्मिती**

- परीसरातील ७ पुरुष तसेच १४ ते १५ महिलांना वर्षभर रोजगार उपलब्ध

**पुरस्कार**

- स्मार्ट महाराष्ट्र चॅनल, सोलापूर - युवा उद्योजक पुरस्कार - २०२१










## विस्तार शिक्षण संचालनालय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी